अनेकान्त एज्युकेशन सोयायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

दि . ०७/०१/२०२२

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती अहवाल

दि. ०३ जानेवारी २०२२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या निमित्त व्याख्यानाचे आयोजित करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार हलिमाबी कुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर हे होते.

हलिमाबी कुरेशी यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगून त्यांच्या कार्याचा धांडोळा घेतला. पत्रकारिता क्षेत्रातील स्वतःचे अनुभव सांगत त्या म्हणाल्या की, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या एनएसएस, एनसीसीच्या माध्यमातून झालेल्या जडणघडणीतून माझ्यामध्ये समाजाप्रती आस्था व भान निर्माण केले. तसेच त्या काळातील संभाषण कौशल्य, एखादया घटनेचे विश्लेषण करणे, निरीक्षण क्षमता याचा आज विविध माध्यमांमध्ये काम करीत असताना फायदा होतो.

या वेळी डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी केले. सुषमा संगई यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. शर्मिला देवकाते यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रंजना नेमाडे यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील १२३ विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक प्राध्यापिका व शिक्षक उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य






GLOBUS




GLOBUS